**बाब क्रमांक २६८/२**

**विषय :- सन २००९ च्या दुस-या पावसाळी अधिवेशनातील " अकोला जिल्हयातील मलकापूर येथील सौ.शकुंतला कोठारी यांच्या मालकीची सर्व्हे क्र. २४/२ मधील २० एकर २८ गुंठे जमीन शासनाने भूसंपादनाच्या नावाखाली संपादित केल्याबाबत " या विषयावर विधान परिषद सभागृहात मा.श्री.गोपिकिशन बाजोरीया, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या चर्चेवेळी उत्तर देताना तत्कालीन मंत्री (मा.श्री.हर्षवर्धन पाटील ) महोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक :६७२५** **दिनांक : १२/०८/२०१६**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, जमीन मालकाला संपूर्ण जमीनीचा मोबदला दिलेला आहे. तसेच अधिकच्या रक्कमेची न्यायालयात मागणी केली. परंतु उच्च न्यायालयाने ती फेटाळली आहे. मंडळाने १९ एकर १६ गुंठयांवर योजना राबविल्या आहेत.सद्य:स्थितीत अमरावती मंडळाकडे उपरोक्त एकूण जमीनीपैकी २४२४ चौ.मी. जमीन शिल्लक असून यापैकी ४७२.५७ चौ.मी. जमीन सर्व्हिस लेन (Service Lane) करिता सोडलेली आहे. त्यामुळे अमरावती मंडळाकडे योजना राबविण्याकरिता फक्त १९५१.४३ चौ.मी. जमीन शिल्लक रहाते . यामध्ये विद्यमान अकोला शहर विकास आराखडयामध्ये आरक्षणात महानगरपालिकेला २५% बांधकाम क्षेत्र विनामोबदला देणे भाग आहे. तसेच म्हाडानी जमीन संपादित केल्यानंतर, अशा जमीनी जमीन मालकास परत करण्याची तरतूद नाही. त्याचप्रमाणे शिल्लक क्षेत्र अत्यंत कमी असल्याने Joint Venture करणे शक्य होणार नसल्याने सदर प्रस्ताव नाकारण्यात आला.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २६८/३**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करणेबाबत व लेखा परिक्षणास सादर करणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७२६** **दिनांक : १२/०८/२०१६**

एकमताने असा निर्णय घेण्यात आला की, सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा वार्षिक लेखा एकमताने स्विकृत करण्यात येत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता, सन २०१५-१६ या वर्षाचा वार्षिक लेखा मा.प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा)- I महाराष्ट्र कार्यालयास लेखापरिक्षणाकरिता सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.